# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0567 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/06/2026 14:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 25/04/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/04/2026
**Time From (वेळेपासून):** 13:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/06/2026 **Time (वेळ):** 14:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/06/2026 14:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 05 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** निंबाळे, तासंगमनरे, जिअहिल, , निंबाळे, तासंगमनरे, जिअहिल,संगमनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** छाया कडु देवरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं.**,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल,अहिल्यानगर ,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल,अहिल्यानगर ,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788215086

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश माधव दातीर | | | 1. पिंप्री लौकी अजमपुर, तासंगमने, संगमनेर ,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.05/06/2026 मी छाया कडु देवरे, वय 37 वर्शे, व्यवसाय- समक्ष
नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं.8788215086.
सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस निरीक्षक या
पदावर 2024 रोजी पासुन कार्यरत आहे. दि.25/04/2026 रोजी आम्हास तक्रारदार संकेत नितिन मेहेत्रे यांनी
आमचेशी मोबाईलवर संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळवुन तक्रारदार
यांना सदर लोकसेवक यांनी दि.25/04/2026 रोजी ता.संगमनेर जि.अहिल्यानगर येथे भेटणार असल्याचे
कळविले. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयानुसार गुन्हा होत असल्याने आम्ही त्यांना दि.
25/04/2026 रोजी संगमनेर येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर लागलीच आम्ही मा.
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर यांना पत्र देवुन दोन पंच साक्षीदार
उपलब्ध करून घेवुन त्यांना कोल्हार, ता.राहता येथे थांबण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही कार्यालयात हजर
असलेले पोका◌ॅ.सचिन सुद्रुक, पोका◌ॅ गायकवाड, पोका◌ॅ.कुळधर यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन
सापळा कारवाई बाबत माहिती देवुन सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन
आम्ही व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकीय वाहन क्र. एम.एच. 16 डी. डब्लु. 7014
या वाहनाने 09.00 वा ला.प्र.वि.कार्यालयातुन निघुन कोल्हार येथे आलो. तेथे आम्ही व सापळा पथकातील
कर्मचारी यांनी वरिल नमुद पंचांशी आपआपसात ओळख करून घेतली. त्यावेळी आम्ही पंचांना कळविले की,
आमचेशी एक तक्रारदार यांनी मोबाईलवर संपर्क करून त्यांची लाचमागणी सबंधाने तक्रार असल्याची कळविले
असुन सदरचे तक्रारदार हे संगमनेर येथे◌े सुरक्षित ठिकाणी भेटणार आहेत. आपणास तेथे जावुन त्यांची तक्रार
ऐकुन त्याप्रमाणे लाचेची सापळा कारवाई करावयाची आहे. त्या कारवाईत तुम्ही पंच म्हणुन काम करण्यास तयार
आहात काय? अशी संमती विचारली असता त्यांनी त्यास संमती दर्शविली. त्यानंतर आम्ही, पंच व सापळा
पथकातील कर्मचारी असे शासकीय वाहनाने कोल्हार येथुन निघुन लोणी मार्गे संगमनेर येथे 12.30 वा. आलो.
त्याठिकाणी तक्रारदार हे त्यांचेकडील चारचाकी वाहनासह हजर होते.आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार
यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री. संकेत नितिन मेहेत्रे, वय- 34
वर्षे, धंदा- हा◌ॅटेल व्यवसाय, राहणार निंबोळे, वाघापुर जोर्वे रोड, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची
तक्रार सांगितली की, "मी वरिल ठिकणी राहण्यास असुन माझे चेअरमन नावाचे समनापुर येथे हा◌ॅटेल असुन
सदरचे हा◌ॅटेल हे भाडे तत्वावर घेतलेले आहे. माझ्या हा◌ॅटेलला ज्या डी.पी मधुन विदयुत पुरवठा होतो त्या डी.
पी.मध्ये बिघाड झाल्याने मी हा◌ॅटेल समोर असलेल्या दुस-या डी.पी मधुन हा◌ॅटेलसाठी लाईट घेतली. दि.
24/04/2026 रोजी दुपारच्या सुमा◌ारास एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) कार्यालय, निंबाळे येथील मेखे
साहेब व त्यांच्यासोबत 03 वायरमन माझ्या हा◌ॅटेलवर आले. त्यावेळी ते मला म्हणाले, तुम्ही दुस-या डी.पी.वरून
लाईट घेवुन वीज चोरी केली आहे. तुमच्यावर वीज चोरीची कारवाई होईल तुम्हाला जर वीज चोरीची कारवाई होवु
दयाची नसेल तर तुम्ही मला साठ हजार रूपये दयावे लागतील असे म्हणुन ते तेथुन निघुन गेले. त्यानंतर सायंकाळी
एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) कार्यालय, निंबाळे येथील वायरमन गणेश दातीर यांनी माझी भेट घेवुन मला
सांगितले की, मेखे साहेबांनी फायनल.50,000/- रूपये सांगितले आहे, त्यापेक्षा कमी होणार नाही, पैसे दिले
नाहीतर तुझ्यावर वीज चोरीची कारवाई होईल. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, वायरमन गणेश दातीर व एम.एस.
ई.डी.सी.एल(महावितरण) कार्यालय, निंबाळे येथील मेखे साहेब हे माझ्याकडे लाचेची मागणी करीत आहे. मला
त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. आज रोजी मी माझ्या कामासंबंधाने वायरमन गणेश दातीर व एम.एस.ई.डी.सी.एल
(महावितरण) निंबाळे येथील मेखे साहेब यांची भेट घेणार आहे. सदर भेटीदरम्यान वायरमन गणेश दातीर व म.एस.
ई.डी.सी.एल(महावितरण) निंबाळे येथील मेखे साहेब यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावर योग्य ती

कायदेशीर कारवाई करावी. माझा वायरमन गणेश दातीर व म.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) निंबाळे येथील मेखे साहेब यांच्याशी कोणताही भांडणतंटा अगर पैसे उसणवारीचा व्यवहार नाही. त्यांनी मागीतलेली लाचेची रक्कम मी माझ्या बचतेतील पैशातुन हजर करेल, '' अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर तक्रारदार श्री. संकेत नितिन मेहेत्रे यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे लोकसेवक गणेश दातीर, वायरमन व लोकसेवक मेखे, एस.ई.डी.सी.एल (महावितरण) निंबाळे येथील अधिकारी हे तक्रारदार श्री. मेहेत्रे यांच्याविरूद्ध वीज चोरीची कारवाई न करणेकरीता लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची ? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळविले. त्यानंतर आम्ही व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेका◌ॅर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर आम्ही व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करून त्यामध्ये तक्रारदार श्री. मेहेत्रे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार श्री. मेहेत्रे असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेका◌ॅर्ड केले◌े. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करून सदरचे रेका◌ॅर्डर तक्रारदार श्री. मेहेत्रे यांचे ताब्यात दिला. तक्रारदार श्री. मेहेत्रे व पंच नं.1 शेवटे यांना लोकसेवक श्री. गणेश दातीर, वायरमन यांची निंबाळे चौफुली येथे भेट घेण्यासाठी 13/50 वा. सुमारास तक्रारदार व पंच नं.1 शेवटे यांना तक्रारदार यांचेकडील फा◌ॅर्चुनर चार चाकी क्रं. एम.एच.16 सी.सी. 4747 वरून रवाना केले. त्यानंतर आम्ही, पंच नं. 2 श्री.पुंड व सापळा पथक असे सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. त्यानंतर 14/19 वा.चे सुमारास तक्रारदार, व पंच नं. 1 श्री. पुंड असे सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडून व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर ताब्यात घेऊन तो बंद केला. त्यावेळी व्हाईस रेका◌ॅर्डरमध्ये फाईल 1/2 अषी तयार झाल्याचे दिसुन आले. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 श्री. शेवटे यांना तक्रारदार यांचेसह लोकसेवक श्री. गणेश दातीर, वायरमन यांची निंभाळे चैफुले येथे भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी विचारले असता त्यांनी पंच नं.2 श्री.पुंड यांचे समक्ष सांगितले की, आपण मला, तक्रारदार श्री.शेवटे यांचेसह लोकसेवक श्री. गणेश दातीर, वायरमन यांची निंभाळे चैफुले येथे भेट घेण्यासाठी रवाना केल्याप्रमाणे आम्ही दोघे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनाने निंबाळे चैफुले येथे गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल नंबर 8010109015 यावरून लोकसेवक गणेश दातीर याच्या मोबाईल नंबर 8668352071 यावर फोनकरून स्पीकर ऑन करून बोलणे केले त्यावेळी लोकसेवक गणेश दातीर यांनी तक्रारदार यांना तुमच्या घराजवळ आहे असे सांगितले त्यानंतर आम्ही निंबाळे चैफुले येथुन जवळच असलेल्या तक्रारदार यांच्या घराजवळ गेलो त्यावेळी सदर ठिकाणी एक इसम हे त्यांच्याजवळील मोटारसायकलवर उभे होते. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांची फोरव्हीलर सदर इसमाजवळ उभी केली. त्यावेळी सदर इसमास तक्रारदार यांनी त्यांच्या गाडीमध्ये बसण्यास सांगितले त्यावेळी माझ्या लक्षात आले की, सदर इसम हे लोकसेवक गणेश दातीर आहेत. त्यानंतर तक्रारदार यांनी मला गाडीमधुन उतरण्यास सांगितले त्यावेळी मी तक्रारदार यांच्या गाडीमधुन उतरलो व गाडीच्या ड्रायव्हर बाजुच्या मागील दरवाजाच्या जवळ जावुन थांबलो. त्यावेळी लोकसेवक गणेश दातीर हे तक्रारदार यांना म्हणाले, तुम्ही बोभाटा कमी करा, तुम्ही फायनल करून टाका. त्यावेळी तक्रारदार म्हणाले किती म्हणतोय तो? त्योवळी लोकसेवक गणेंश दातीर म्हणाले, पन्नास म्हणाले ते. त्यावेळी तक्रादार म्हणाले पन्नास हजार रूपयाच्या खाली एक रूपया नाही करणार का? त्यावर लोकसेवक गणेश दातीर म्हणाले फायनल साठ हजार रूपये सांगितले होते. त्यावेळी तक्रारदार श्री.मेहेत्रे लोकसेवक गणेश दातीर यांना म्हणाले, मेखे साहेब यांची मला भेट घालुन दया, मी त्यांच्याशी बोलणे करतो. त्यावेळी लोकसेवक गणेश दातीर यांनी मेखे साहेब यांना फोन करून भेटण्याबाबत विचारले. त्यानंतर लोकसेवक गणेश दातीर यांनी तक्रारदार यांना कॅश घेवुन मेखे साहेब यांना भेटण्यासाठी निंबाळे येथील एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) कार्यालय येथे येण्यास सांगितले, अशी हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी लॅपटा◌ॅपमधील का◌ॅपी केलेल्या फाईल नं. 1/2 व्यवस्थीत ऐकुन पाहता, त्यामध्ये तक्रारदार, लोकसेवक श्री. गणेश दातीर, वायरमन यांचेत झालेले संभाषण ऐकले सदर संभाशणावरून व पंच नं.1 तसेच तक्रारदार श्री.मेहेत्रे यांनी सांगितलेल्या हकिकतीवरून लोकसेवक गणेश दातीर, वायरमन यांनी तक्रारदार श्री.मेहेत्रे यांच्याकडे त्यांच्या विरूद्ध वीज चोरीची कारवाई न करणेकरीता 50,000/- रूपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले. त्यामुळे लोकसेवक गणेश दातीर, वायरमन यांचे विरूध्द सापळा लावण्याचे ठरले.आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 50,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 100 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोÚया कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा

कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हा◌ॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोका◌ॅ.कुळधर यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवष्यकत्या सुचना दिल्या व तक्रारदार यांना कळविले की, त्यांनी पंच नं. 1 श्री.शेवटे यांना सोबत घेवुन लोकसेवक गणेश दातीर यांची एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण), निंबाळे कार्यालय येथे जावुन मेखे साहेब यांच्या समक्ष भेट घ्यावी. भेट झाले नंतर लोकसेवक गणेश दातीर, वायरमन यांनी तुमच्यावर वीज चोरीची कारवाई होवु न देणेसाठी मेखे साहेब यांच्यासाठी लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान मागणी केलेल्या 50000/- रूपये लाचेची मागणी केल्यास, त्यांना अँन्था◌ॅसिन पावडर लावुन पॅन्टचे पुढील उजवे बाजुच्या खिषात ठेवलेली लाचेची रक्कम रुपये 50,000/- ही उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरावी व त्यांना मोजुन घेणे बाबत विनंती करावी. तसेच लाच स्विकारले नंतरचा इशारा करावा अशा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या.त्यानंतर आम्ही व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करून तक्रारदार यांचे ताब्यात दिले. तक्रारदार यांना पंच नं.1 श्री.शेवटे यांचेसह लोकसेवक गणेश दातीर, वायरमन यांची भेट घेण्याकरीता एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) निंबाळे कार्यालय येथे जाण्यासाठी तक्रारदार यांचेकडील फा◌ॅरच्युनर चारचाकी क्र. एम.एच.16.सी.सी.4747 वरून ने रवाना केले. ती वेळ 15/00 वा. ची होती. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना होवुन एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) निंबाळे येथे आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार नियो◌ेजित इशारा नं करता एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) कार्यालय, निंबाळे येथुन तक्रारदार व पंच नं 1 श्री. शेवटे असे त्यांच्या चारचाकी वाहनाने सुरक्षित ठिकाणी परत आले त्यांच्या पाठोपाठ सापळा पथक देखील शासकीय वाहनाने सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेका◌ॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. ती वेळ 15.19 वा.चे सुमाराची होती. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 श्री.शेवटे यांना रवाना केलेपासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, आपण मला तक्रारदार यांचेसह रवाना केल्यानंतर मी व तक्रारदार असे चारचाकी वाहनाने एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) निंबाळे कार्यालय येथे काही अंतरावर जावुन थांबलो. त्यावेळी आमचे मागोमाग आपण, पंच नं. 2, सापळा पथकातील कर्मचारी असे एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) निंबाळे कार्यालय येथे आसपास कोणालाही दिसणार नाही अशा पध्दतीने सापळा लावुन थांबले. आपण व सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर मी व तक्रारदार असे एम.एस. ई.डी.सी.एल(महावितरण) निंबाळे कार्यालय येथे मध्ये जावुन लोकसेवक गणेश दता◌ीर, वायरमन यांचा शोध घेतला परंतु ते तेथे मिळुन आले नाही. त्यावळी तक्रारदार यांनी कार्यालयामध्ये उपस्थित असलेल्या एका कर्मचा-याकडे लोकसेवक गणेश दातीर व लोकसेवक मेखे, साहेब यांच्याबाबत चैकशी केली असता सदर कर्मचा-याने ते दोघे पण बाहेर गेले आहे तुम्ही त्यांना फोन करा असे सांगितले त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल नंबर 8010109015 यावरून लोकसेवक गणेश दातीर याच्या मोबाईल नंबर 8668352071 यावर फोनकरून स्पीकर आँन करून फोन लावला असता लोकसेवक गणेश दातीर यांनी फोन रिसिव्ह केला नाही. त्यानंतर मी व तक्रादार असे सुरक्षित ठिकाणी परत आलो, अषी हकीकत सांगितली. त्यानंतर तक्रारदार श्री.संकेत मे◌ेहेत्रे यांनी सांगितले की, लोकसेवक गणेश दातीर यांना काहीतरी काम लागले असल्याने त्यांची भेट झाली नाही तसेच लोकसेवक गणेश दातीर यांनी माझा फोन देखील उचलला नाही त्यामुळे आज रोजीची सापळा कारवाई तात्पुरती स्थिगित करावी. तसेच मी लोकसेवक गणेश दातीर यांच्याशी स्वतःहुन संपर्क केल्यास त्यांना माझा संशय येईल त्यामुळे लोकसेवक गणेश दातीर यांनी माझ्याशी संपर्क केल्यास मी आपणास त्वरीत संपर्क करेल त्यावेळी सापळा कारवाई आयोजित करावी. त्यामुळे सर्वानुमते सदर सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना सुचना दिल्या की, त्यांनी सदर कारवाईची गोपनियता बाळगावी, तसेच लोकसेवक गणेश दातीर यांनी संपर्क केल्यास तात्काळ आम्हास संपर्क करावा अशा सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. संकेत मेहेत्रे यांना जाणेस मोकळीक दिली. त्यानंतर पंचनाम्याचे पुढिल कामकाज लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे करण्यात आले. त्यानंतर दि.30/04/2026 रोजी तक्रारदार श्री.संकेत मेहेत्रे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे समक्ष हजर होवुन कळविले की, दिनांक 25/04/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक गणेश दातीर, वायरमन यांनी माझ्या विरूद्ध वीज चोरीची कारवाई न करणेकरीता एम. एस.सी.बी. कार्यालयाचे अधिकारी श्री. मेखे साहेब यांच्याकरीता 50,000/- रूपये लाचेची मागणी केली परंतु सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक गणेश दातीर यांना माझा काहीतरी संषय आला असल्यामुळे त्यांनी फोन बंद केला व माझी भेट देखील घेतली नाही. तसेच दि.28/04/2026 रोजी लोकसेवक गणेश दातीर यांनी माझी भेट घेवुन कळविले की, मेखे साहेब तुमच्याकडुन पैसे घेणार नाही तुमच्याविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. यावरून माझ्या खात्री झाली की, लोकसेवक गणेश दातीर यांना माझा काहीतरी संशय आला असल्यामुळे त्यांनी

माझ्याकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही व भविश्यात माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत. तरी आपण ही सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करून दि. 25/04/2026 रोजी लोकसेवक गणेश दातीर यांनी माझ्याकडे माझ्या विरूद्ध वीज चोरीची कारवाई न करणेकरीता मेखे साहेब यांच्याकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली म्हणुन त्यांचे विरूध्द कायदेषीर कारवाई करावी असे कळविले. त्यानुसार तक्रारदार यांचा सविस्तर जबाब नोंदवुन सदरची कारवाई पुर्णतः स्थगित करण्यात आली. तरी दिनांक 25/04/2026 रोजी 13/50 ते 14/19 वाजेच्या दरम्यान निंबाळे चैफुले येथील तक्रारदार श्री. संकेत नितिन मेहेत्र यांच्या घराजवळ, निंबाळे ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे लाचमागणी पडताळणीवेळी लोकसेवक गणेश दातीर, बाहयस्त्रोत वायरमन, एम.एस.ई.डी.सी.एल (महावितरण) कार्यालय, निंबाळे, ता.संगमनरे, जि.अहिल्यानगर यांनी तक्रारदार यांच्याकडे तक्रारदार यांच्या विरूद्ध वीज चोरीची कारवाई न करणेकरीता एम.एस.ई.डी.सी.एल(महावितरण) कार्यालय, निंबाळे येथील मेखे साहेब यांच्याकरीता 50,000/- रूपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाच मागणी पडताळणी करावाईमध्ये स्पष्ट झाले आहे, म्हणुन यातील लोकसेवक गणेश माधव दातीर, वय- 24 वर्षे, बाहयस्त्रोत कर्मचारी, सहाय्यक अभियंता, जोर्वे कक्ष कार्यालय, 33/11 केव्ही निंबाळे, उपकेंद्र संगमनेर, एम.एस.ई. डी.सी.एल(महावितरण) , ता.संगमनरे, जि.अहिल्यानगर रा. मु.पो.पिंप्री लौकी अजमपुर, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रश्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

sameer navnath baravkar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रतं मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by (नोंदणी अधिकारी)**
**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**
**Name (नाव):** sameer navnath bar
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**